N.C.R.B (एन.सी.आ...)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** मंगरूळपीर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0024 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/01/2026 23:58

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 15/01/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/01/2026
**Time From (वेळेपासून):** 15:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 15/01/2026 **Time (वेळ):** 23:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 037
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/01/2026 23:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय जांब रोड मंगरुळ,ता मंगरुळपीर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अल्का मोहन गायकवाड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अलाडा प्लॉटवाशिम ,वाशिम,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अलाडा प्लॉटवाशिम ,वाशिम,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8446878903

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविंद्र रंगनाथ खुडे | | | 1. खंडोबा चौक नांदेड ,नांदेड, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 10,000/ | 10,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

नक्कल फिर्यादि लाप्रवि वाशिम कॅम्प पो.स्टे.मंगरुळपीर दिनांक:- 15 /01/2026
मी अल्का मोहन गायकवाड, वय 38 वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम, मो.नं.8329033177

मी आज रोजी सरतर्फे समक्ष फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंध विभाग वाशिम येथे पोलीस निरीक्षक म्हणुन 04/09/2024 पासुन कार्यरत आहे. दि. 14/01/2026 रोजी लाप्रवि कार्यालय वाशिम येथे कर्तव्यावर हजर असतांना पो.उप.अधि.जगदीश परदेशी यांनी मला तक्रारदार यांचा फोन नंबर पाठवुन तक्रारदार यांचेशी संपर्क करुन त्याचे तक्रारी संबधाने कारवाई करण्याच्या फोनव्दारे सुचना दिल्या. मी तक्रारदार यांचे फोनवर फोन केला असता त्यांनी मला लोकसेकाविरुध्द लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगीतले. तसेच तक्रारी करीता दि. 15/01/2026 रोजी मंगरुळपीर येथे भेटण्याचे सांगीतले वरुन आम्ही मा.जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रुग्णालय वाशिम यांना पत्र देउन दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेतले.

दि.15/01/2026 रोजी आम्ही, सापळा पथक व पंच असे शासकिय वाहनाने महावितरन सबस्टेशन मंगरुळपीर कंपाउंडचे बाजुला मोकळया जागेत जाउन तक्रारदार यांची भेट घेतली असता त्यांनी त्यांचे नाव विष्णु बंडुजी गोदमले, वय - 47 वर्षे, व्यवसाय - मजुरी, रा.भिलडोंगर ता.मानोरा जि.वाशिम असे सांगीतले. त्यावेळी आम्ही त्यांना सापळा पथक तसेच दोन्ही पंचांची ओळख करुन देवुन त्यांची तक्रार नोंदवुन घेतली ती पुढीलप्रमाणे, " मी, विष्णु बंडुजी गोदमले ग्राम भिलडोंगर ता.मानोरा येथील रहिवासी असुन शेतमजुरी करतो. माझे आई ग.भा. कमलाबाई बंडुजी गोदमले हिचे नावे ग्राम आजगाव ता.मंगरुळपीर येथे सर्वे/गट नंबर 2 मध्ये 0.41 आर इतकी शेती आहे. मला गणेश बंडुजी गोदमले हा लहान भाउ आहे. माझे आईचे नावे असलेल्या शेतीमधील 0.20 आर शेती माझे नावे करायची आहे. त्यासाठी मी दि.09/01/2026 रोजी आजगाव येथील तलाठी खुडे सांहेब यांना त्यांचे मंगरुळपीर येथील तलाठी कार्यालयात भेटलो. मी तलाठी खुडे यांना माझ्या आईच्या नावाने असलेली शेती ही माझे नावे करायचे असल्याचे सांगीतले. त्यावेळी खुडे यांनी शेती माझे नावे करण्या करीता एक अर्ज व स्थावराचे वाटणीपत्र लागते अशी माहिती देउन सदर 0.20 आर शेती माझे नावाने करण्यासाठी 15000/- रु दयावे लागतील असे बोलुन माझे कडे 15000/- रुपये लाच मागणी केली. परंतु शेती माझे नावे करण्या करीता पैसे देण्याची आवश्यकता नसल्याचे मला माहिती आहे.

तलाठी खुडे साहेब यांना लाच देण्याची माझी इच्छा नाही. तलाठी खुडे यांच्याशी माझा कोणताही उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच आपशी दुश्मनी नाही. तरी तलाठी खुडे यांच्यावर लाच मागणी प्रकरणात कारवाई करावी ही विनंती. मला लिहीता वाचता येत नाही. त्यामुळे सदर तक्रार माझे सांगीतल्याप्रमाणे पंच क्र.1 श्री.शुभम आपोतीकर यांनी त्यांचे हस्ताक्षरात लिहीली आहे.तक्रारी सोबत मी तलाठी यांना केलेला अर्ज,स्थावर वाटणीपत्र,शेतीचा 7/12 ची छायांकित प्रत देत आहे." तक्रारदार यांनी, दिलेल्या तक्रारीवर दोन्ही पंचानी, तक्रारदार यांनी व समक्ष म्हणुन मी सुध्दा सही केली.

आम्ही तक्रारदार व पंच क्र.01 यांना सूचना दिली की, तलाठी खुळे हे तक्रादार यांना त्यांचे आईचे नावावर असेलेले शेत हे तक्रादार यांच्या नावावर करण्यासाठी 15000/- रु. लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत तक्रारदार व पंच क्र.01 यांना तलाठी खुडे साहेब यांची भेट घेवून बोलणी करणेकरीता जांब रोड वरील तलाठी कार्यालय मंगरुळपीर येथे पाठविण्यात येणार असून तक्रारदार यांनी तलाठी खुडे यांची भेट घेउन बोलनी करावी. तक्रारदार यांना त्यांचे शर्टचे आतुन व्हाईस रेकॉर्डर लावले व पंच क्र.01 यांचे सह तलाठी खुडे यांचे भेटीकरीता पाठविले. काही वेळाने तक्रारदार व पंच क्र.01 हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. पडताळणी दरम्यान तक्रारदार व तलाठी खुडे यांची जांब रोड वरील तलाठी कार्यालय मंगरुळपीर येथे भेट झाली भेटी दरम्यान
तक्रारदार हे तलाठी खुडे यांना म्हणाले की, "राम राम" त्यावर तलाठी खुडे तक्रारदार यांना म्हणाले की, "बाकीचे

21 गुंठे कोणाच्या नावाने करायची... ते बुडीच्याच नावान ठेवायची ", त्यावर तक्रारदार म्हणाले की, "ते बुडीच्याच नावान ठेवायची.. त्यावर तलाठी खुडे तक्रारदार यांना म्हणाले की, "भाउ काही म्हणत नाही...काय म्हणतो ", त्यावर तक्रारदार म्हणाले की, "ते त्याच्या हिशोबान करल साहेब... आपल आपण करून घ्यायच.... किती... ", त्यावर तलाठी खुडे हे तक्रारदार यांना म्हणाले की, "विस.... ", त्यावर तक्रारदार म्हणाले की, "विस हजार रुपये लय होतात नं.. ", असे म्हटले असता तलाठी खुडे, तक्रारदार यांना म्हणाले की, "पंधरा द्या ", त्यावर तक्रारदार म्हटले की, "पंधरा हजार रूपये का?, त्यावर तलाठी खुडे, तक्रारदार यांना म्हणाले की, "बस आता बोलू नका काई...द्या आणुन, त्यावर तक्रादार म्हटले की, "बर मंग दोनएक घंट्यानं जमल न... " त्यावर तलाठी खुडे तक्रारदार यांना म्हणाले की, "हो या दोनएक घंट्यानं येवून जा.., असे बोलुन तक्रारदार यांचा फोन नंबर घेतला... असे तक्रारदार व तलाठी खुडे यांचेत बोलणी झाली.

यावरुन तलाठी खुडे, जांब रोड तलाठी कार्यालय मंगरुळपीर यांनी तक्रारदार यांना त्यांचे आईचे नावे असलेली शेत जमीन तक्रारदार यांचे नावावर करण्याकरीता 15,000/-रुपये स्पष्ट लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. व सदर लाचरक्कम ही एक,दोन तासात स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दि.15/01/2026 रोजी तलाठी खुडे, जांब रोड तलाठी कार्यालय मंगरुळपीर यांचेवर सापळा कारवाई ही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. यासंबधीची माहिती आम्ही पो.उप.अधि.परदेशी यांना फोनवरुन दिल्याने सापळा कारवाई करीता पो.उप.अधि परदेशी हे आम्ही सांगीतलेल्या ठिकाणी मंगरुळपीर येथे स्टाफसह शासकिय वाहनाने हजर आले.

दि.15/01/2026 रोजी सापळा कारवाई करीता आम्ही पोनि गायकवाड ,लाप्रवि पथक ,दोन्ही पंच व तक्रारदार, तक्रारदार यांचा चुलत जावाई विष्णु सस्ते असे सापळा कारवाई करीता महावितरन सबस्टेशन चे बाजुला मोकळया मैदानात हजर असतांना तेथे पो.उप.अधि. जगदीष परदेशी व लाप्रवि स्टाफ तेथे आला. आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांना 15000/- रु लाच रक्कम हजर करण्यास सांगीतली असता. तक्रारदार यांनी 10000/- रु लाच रक्कम हजर केली. उर्वरीत 5000/- एव्हढी रक्कम त्यांचेकडे नसल्याचे सांगीतले. त्यामुळे सापळा कारवाई दरम्यान तलाठी खुडे यांना 10000/- रुपये देण्याचे ठरले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या 10000/- रु रक्कमेस अँन्थ्राँसिन पावडर लावण्यात आली. सापळा कारवाई ही जांब रोड वरील तलाठी कार्यालय मंगरुळपीर येथे आयोजीत करण्यात आली. तक्रारदार यांना लाच रक्कमेसह तसेच व्हाईस रेकाँर्डर लावुन पाठविले. तसेच त्यांचे पाठोपाठ लगेच तलाठी कार्यालय येथे सापळा कारवाईचे पथक सापळा लावुन दबा धरुन बसले. तलाठी हे तथे हजर नव्हते. काही वेळाने तलाठी खुडे जांब रोड वरील तलाठी कार्यालय मंगरुळपीर येथे आले. सापळा कारवाई दरम्यान तलाठी खुडे यांनी तक्रारदार यांना म्हटले की, "पंधरा " त्यावर तक्रारदार म्हणाले की, "दहाच हायत " त्यावर तलाठी खुडे तक्रारदार याना म्हणाले की, "काहुन पाच, त्यावर तक्रारदार म्हणाले की, " देतोनं एक दोन दिवसानं... ऐव्हढ करा आलोकी देतो ", असे बालेले... त्यानतर तलाठी खुडे यांनी तक्रारदार यांचेकडुन अंदाजे 15.38 वाजताचे सुमारास 10,000/- रुपये लाचेचा पहीला हप्ता म्हणुन स्विकारले. तक्रारदार यांनी ठरल्याप्रमाणे त्यांचे गळयातील शेला खांदयावर टाकुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पूर्व नियोजीत इशारा केला. त्यावरून तात्काळ आम्ही, पो.उप.अधि. जगदीष परदेशी, सापळा पथक असे तलाठी कार्यालयात पोहचुन तलाठी खुडे यांना 10,000 /रू लाच रक्कमेसह ताब्यात घेवुन त्यांच्या कडुन लाच रक्कम हस्तगत केली. तलाठी खुडे यांना ताब्यात घेतले व पुढिल कारवाई करीता लाप्रवि कार्यालय वाशिम येथे आणण्यात आले.

आलोसे रविंद्र रंगनाथ खुडे, वय-49 वर्शे, पद- ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), जांब रोड, तलाठी कार्यालय मंगरुळपीर यांनी तक्रारदार यांचे आईचे नावावर असलेली शेत जमीन तक्रारदार यांचे नावावर करण्याकरीता दि. 15/01/2026 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान 15000/- रुपये लाचेची स्पष्ट मागणी करुन दि. 15/01/2026 रोजी सापळा कारवाई 15/15 वा. ते 15/40 वा. दरम्यान आलोसे रविंद्र रंगनाथ खुडे, वय-49 वर्शे, पद- ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), जांब रोड, तलाठी कार्यालय मंगरुळपीर यांनी लाच रक्कमेती हप्ता 10,000/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. त्यांचे हे कृत्य कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988 प्रमाणे होत असल्याने माझी त्यांचे विरुध्द सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे

(अल्का.एम.गायकवाड)
पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.वाशिम

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
DYANESHWAR GANESHRAO DHAWALE
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): PBMAH89801
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

A.M. Gaikwad

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Kishor Himatrao She
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 88904